MHPU200041872023

**<u>फौ. कि.अर्ज.क्र. ५४/२०२३ मधील</u>**
**<u>निशाणी क्र.५ वरील आदेश.</u>**

**१.** अर्जदारांनी कौटुंबिक हिंसाचारपासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ अन्वये आर्थिक लाभ म्हणुन अंतरिम पोटगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदारांचे अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, जाबदेणार क्र. १ हे अर्जदार हिचे पती आहे. अर्जदार क्र. १ व जाबदेणार क्र. १ यांना सदर विवाह संबंधातुन अर्जदार क्र. २ नामे आयत नौशाद खान ही मुलगी झालेली आहे. जाबदेणार क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ व २ यांचा स्वत:हुन त्याग केलेला आहे. तसेच अर्जदार क्र. १ हिस उत्पन्नाचे कोणतेही साधन नसुन अर्जदार क्र.२ हिच्या शिक्षणाचा खर्च अर्जदार क्र. १ ही करण्यास असमर्थ आहे. त्याचप्रमाणे अर्जदार क्र. १ व २ यांना पालन, पोषण आणि औषधोपचाराकरीता दरमहा रक्कम रूपये पंधरा ते वीस हजार रूपयांची आवश्यकता आहे. तसेच घडभाड्यासाठी सात ते नऊ हजार रूपयांची आवश्यकता आहे.

**३.** अर्जदारांचे अर्जातील पुढील कथन असे आहे की, जाबदेणार क्र. १ हे नगर शहरामधील विवो कंपनीच्या शोरूममध्ये नोकरी करतात. तसेच जाबदेणार क्र. १ यास सदर नोकरीपासुन दरमहा रक्कम रूपये पस्तीस ते चाळीस हजार रूपये इतका पगार मिळत आहे. मुळ अर्जाचा अंतिम गुणदोषावर निर्णय लागणेकामी बराचसा कालावधी लागणार आहे. दरम्यानच्या कालावधीमध्ये अर्जदार क्र. २ हिच्या शिक्षणासाठी व अर्जदार क्र. १ व २ यांच्या पालन पोषणासाठी आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. त्यामुळे

अर्जदारांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज खर्चासह मंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

४. जाबदेणार क्र. १ यांनी अर्जदारांचा मुळ अर्ज व सदरचा अर्ज यावर निशाणी क्र.१९ वर त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. अर्जदार क्र. १ व जाबदेणार क्र. १ यांचा विवाह मुस्लीम धर्म शास्त्राप्रमाणे व हनफी सुन्नी मुस्लिम रितीरिवाजाप्रमाणे शिरुर येथे झालेला आहे. उभयतांमध्ये सदरचे वैवाहिक संबंध अद्याप कायम असुन कोणत्याही प्रकारे फारकत अगर तलाक झालेला नाही. सदर वैवाहिक संबंधातुन अर्जदार क्र. १ व जाबदेणार क्र. १ यांना अर्जदार क्र. २ ही मुलगी झालेली आहे हा संपुर्ण मजकुर जाबदेणार क्र. १ यांनी मान्य व कबुल केलेला आहे. परंतु, जाबदेणार क्र. १ यांनी अर्जातील उर्वरित कथने नाकारलेली आहेत.

५. जाबदेणार क्र. १ यांचे पुढील कथन असे आहे की, अर्जदार क्र. १ ही देहरे येथे जाबदेणार यांच्याकडे सासरी नांदण्यास आली. अर्जदार क्र. १ ही सुरूवातीचे पाच ते सहा महिने व्यवस्थित राहिली. त्यानंतर अर्जदार क्र. १ ही घरातील कामावरून काही तरी कुरापती काढुन जाबदेणार यांच्याशी भांडणतंटा करित असे. तसेच, अर्जदार क्र. १ ही जाबदेणार क्र. १ पासुन विभक्त राहण्याची मागणी करून वाद करू लागली. जाबदेणार क्र. १ यांचे आई—वडील हे वयोवृध्द असल्यामुळे त्यांची जबाबदारी जाबदेणार क्र. १ यांच्यावर असल्यामुळे ते तिच्यापासुन विभक्त राहू शकत नव्हते. अर्जदार क्र. १ ही जाबदेणार यांच्याशी उध्दटपणे व अपमानस्पद वागणुक देत असे. अर्जदार क्र. १ ही विनाकारण भांडणे करून तिच्या माहेरी निघुन जात असे. परंतु, जाबदेणार क्र. १ यांना अर्जदार क्र. १ हिच्याशी संसार करण्याची प्रामाणिक इच्छा असल्यामुळे जाबदेणार क्र. १ हे तिचे मनधरणी करून तिला नांदवण्यास घेवुन येत असे.

६. जाबदेणार क्र. १ यांचे पुढील कथन असे आहे की, अर्जदार क्र. १ ही चौहान नावाच्या महिलेच्या सांगण्यावरून नेहमी अगरबत्ती वगैरे लावुन जादूटोण्यासारखे प्रयत्न करित असत. तसेच, अर्जदार क्र. १ ही अंधश्रध्देला बळी पडत असे. जाबदेणार क्र. १ यांनी तिला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु, अर्जदार क्र. १ हिने त्यांचे ऐकत नसे. तसेच, जाबदेणार क्र. १ यांच्याशी भांडण करून तिच्या माहेरी निघुन जाण्याची धमकी देत असत. अर्जदार क्र. १ ही जाबदेणार क्र. १ यांच्याबरोबर भांडण करुन सर्व दागदागिने व दहेज वस्तु घेवुन अर्जदार क्र. २ सह तिच्या माहेरी निघुन गेलेली आहे.

७. जाबदेणार क्र. १ यांचे पुढील कथन असे आहे की, जाबदेणार क्र. १ याने अर्जदार क्र. १ हिस अनेक वेळा तिच्या माहेरी जावुन तिला नांदविण्यास येण्याची विनंती केली. परंतु, अर्जदार क्र. १ हिने प्रत्येकवेळी जाबदेणार यांच्याकडे नांदण्यास येण्यास नकार दिलेला आहे. दि. १४/०६/२०२२ रोजी जाबदेणार क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ हिस विधीज्ञामार्फत नोटीस पाठवून नांदण्यास येण्याचे कळविलेले आहे. परंतु, त्यानंतर देखील अर्जदार क्र. १ ही जाबदेणार क्र. १ यांच्याकडे नांदण्यास आलेली नाही. त्यामुळे जाबदेणार क्र. १ यांनी मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अहमदनगर यांच्या न्यायालयामध्ये रे.मु. क्र. ५४५/२०२२ हा अर्जदार क्र. १ हिने जाबदेणार क्र. १ यांच्या नांदण्यास येण्याकरिता दाखल केलेला आहे. जाबदेणार यांनी अर्जदार क्र. १ हिस नांदविण्यास प्रयत्न केलेले आहेत. परंतु, अर्जदार क्र. १ ही जाबदेणार यांच्याकडे नांदण्यास आलेली नाही.

८. जाबदेणार क्र. १ यांचे पुढील कथन असे आहे की, जाबदेणार क्र. १ हा मजुरी करत आहे. तसेच, जाबदेणार क्र. १ यांच्यावर त्यांच्या आईची औषधोपचाराची तसेच, इतर खर्चांची जबाबदारी आहे. त्यामुळे जाबदेणार क्र. १ यांची अर्जदारांना स्वतंत्र पोटगी देण्याची ऐपत नाही. याउलट, अर्जदार क्र.

१ ही शिक्षिका असुन ती स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे. तसेच, अर्जदार क्र. १ ही वात्सल्य हॉस्पिटल, शिरूर, ता.शिरुर, जि. पुणे येथे नोकरी करित आहे. तसेच, अर्जदार क्र. १ हिचे आई—वडीलांचा बांगड्यांचा व्यवसाय असुन त्यापासुन त्यांना ब—यापैकी उत्पन्न मिळते. त्याचप्रमाणे अर्जदार क्र. १ हिच्या आई—वडीलांचे शिरुर येथे स्वमालकीचे घर मिळकत आहे. अर्जदार क्र. १ हिच्या आई—वडीलांचे आर्थिक परिस्थिती चांगली आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ ही स्वत: चा व अर्जदार क्र. २ यांचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे.

**९.** जाबदेणार क्र. १ यांचे पुढील कथन असे आहे की, अर्जदार क्र. १ हिने जाबदेणार क्र. १ यांचा कोणतेही योग्य व संयुक्तिक कारणाशिवाय त्याग केलेला आहे. अर्जदार क्र. १ हिने जाबदेणार क्र. १ यांना संसार सुखापासून वंचित ठेवलेले आहे. जाबदेणार यांनी अर्जदार क्र. १ हिचा कौटुंबिक हिंसाचार केलेला नाही. अर्जदार क्र. १ ही स्वइच्छेने तिच्या माहेरी राहत आहे. अर्जदारांनी सदरचा अर्ज जाबदेणार यांना शारिरीक, मानसिक आणि आर्थिक त्रास देण्याच्या दुष्ट हेतुने दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

**१०.** अर्जदारांचे सन्माननिय विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार क्र. १ व जाबदेणार क्र. १ यांचा विवाह मुस्लिम धर्मशास्त्र व रितीरिवाजाप्रमाणे दिनांक १५/०५/२०१६ रोजी झालेला असुन सदर वैवाहीक संबंधातुन अर्जदार क्र. १ व जाबदेणार क्र. १ यांना अर्जदार क्र. २ ही अपत्य झालेले आहे. जाबदेणार क्र. १ हे अर्जदार क्र. १ हिचे पती असुन अर्जदार क्र. २ हिचा पिता आहे. जाबदेणार क्र. १ यांनी अर्जदार व जाबदेणारे यांच्यामधील विवाह व नातेसंबंधाबाबतचा मजकुर मान्य व कबुल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ही लग्नानंतर जाबदेणार यांच्याकडे नांदण्यास

गेली. अर्जदार क्र. १ ही जाबदेणार यांच्याकडे नांदत असतांना त्यांनी अर्जदार क्र. १ हिचा शारिरीक व मानसिक त्रास देवुन हिचा कौटुंबिक हिंसाचार केलेला आहे. जाबदेणार क्र. १ हा अर्जदार क्र. १ हिचा पती व अर्जदार क्र. २ हिचा पिता या नात्याने अर्जदारांचे पालनपोषण व उदरनिर्वाहाची तरतुद करणे त्यांची कायदेशीर जबाबदारी व कर्तव्य आहे. परंतु, जाबदेणार क्र. १ यांनी अर्जदारांच्या पालनपोषण व उदरनिर्वाहाची कोणतीही तरतुद अद्यापपावेतो केलेली नाही. सदरची बाब ही अर्जदारांच्या कौटुंबिक हिंसाचारास पुरेशी आहे. अभिलेखावरील कौटुंबिक घटना अहवालावरून अर्जदार क्र. १ ही जाबदेणार यांच्या कौटुंबिक हिंसाचारास बळी पडलेली आहे असे प्रथमदर्शनी दिसते.

**११.** अर्जदारांचे सन्माननीय विधिज्ञ यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, जाबदेणार क्र. १ हे नगर शहरामधील विवो कंपनीच्या शोरूममध्ये नोकरी करतात. तसेच जाबदेणार क्र. १ यास सदर नोकरीपासुन दरमहा रक्कम रूपये पस्तीस ते चाळीस हजार रूपये इतका पगार मिळत आहे. त्यामुळे जाबदेणार क्र. १ यांची अर्जदारांना आर्थिक लाभ म्हणुन अंतरीम पोटगी देण्याची ऐपत आहे. अर्जदार क्र. १ हिस उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार क्र. १ हिला निवासाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार क्र. १ हिला जाबदेणार यांच्या त्रासामुळे तिच्या माहेरी आई—वडीलांकडे रहावे लागत आहे. अर्जदार क्र. १ हिने जाबेदणार यांच्याविरूध्द दाखल केलेला मुळ अर्ज गुण दोषांवर चालवुन त्याचा निर्णय होण्यास बराच कालावधी लागणार आहे. अर्जदार क्र. १ ही जाबदेणार यांच्या कौटुंबिक हिंसाचारास बळी पडलेली आहे. सदरचा अर्ज खर्चासह मंजुर करण्याची विनंती केली आहे.

**१२.** जाबदेणार क्र.१ यांचे सन्माननीय विधिज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, अर्जदार क्र. १ व जाबदेणार क्र. १ यांचा मुस्लिम धर्मशास्त्राप्रमाणे

विवाह झालेला असुन त्यांना सदर वैवाहीक संबंधातुन अर्जदार क्र. २ ही अपत्य झालेले आहे. तसेच अर्जदार व जाबदेणार क्र. १ यांच्यामधील नातेसंबंध मान्य व कबुल आहे. अर्जदार क्र. १ ही देहरे येथे जाबदेणार यांच्याकडे सासरी नांदण्यास आली. अर्जदार क्र. १ ही सुरूवातीचे पाच ते सहा महिने व्यवस्थित राहिली. त्यानंतर अर्जदार क्र. १ ही काही तरी कुरापती काढुन जाबदेणार यांच्याशी भांडणतंटा करित असे. तसेच अर्जदार क्र. १ ही जाबदेणार क्र. १ पासुन विभक्त राहण्याची मागणी करून वाद करू लागली. जाबदेणार क्र. १ यांचे आई—वडील हे वयोवृध्द असल्यामुळे त्यांची जबाबदारी जाबदेणार क्र. १ यांच्यावर असल्यामुळे ते तिच्यापासुन विभक्त राहू शकत नव्हते. अर्जदार क्र. १ ही जाबदेणार यांच्याशी उध्दटपणे व अपमानस्पद वागणुक देत असे. अर्जदार क्र. १ ही विनाकारण भांडणे करून तिच्या माहेरी निघुन जात असे. परंतु जाबदेणार क्र. १ यांना अर्जदार क्र. १ हिच्याशी संसार करण्याची प्रामाणिक इच्छा असल्यामुळे जाबदेणार क्र. १ हे तिचे मनधरणी करून तिला नांदवण्यास घेवुन येत असे. अर्जदार क्र. १ ही अंधश्रध्देला बळी पडत असे. जाबदेणार क्र. १ यांनी तिला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु, अर्जदार क्र. १ हिने त्यांचे ऐकत नसे. तसेच, जाबदेणार क्र. १ यांच्याशी भांडण करून तिच्या माहेरी निघुन जाण्याची धमकी देत असत. अर्जदार क्र. १ ही जाबदेणार क्र. १ यांच्याबरोबर भांडण करुन सर्व दागदागिने व दहेज वस्तु घेवुन अर्जदार क्र. २ सह तिच्या माहेरी निघुन गेलेली आहे.

**१३.** जाबदेणार क्र.१ यांचे सन्माननीय विधिज्ञ यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, जाबदेणार क्र. १ याने अर्जदार क्र. १ हिस अनेक वेळा तिच्या माहेरी जावुन तिला नांदविण्यास येण्याची विनंती केली. परंतु अर्जदार क्र. १ हिने प्रत्येकवेळी जाबदेणार यांच्याकडे नांदण्यास येण्यास नकार दिलेला आहे.

त्यामुळे अर्जदार क्र. १ हिस विधीज्ञामार्फत नोटीस पाठवुन नांदण्यास येण्याचे कळविलेले आहे. जाबदेणार क्र. १ यांनी मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अहमदनगर यांच्या न्यायालयामध्ये रे.मु. क्र. ५४५/२०२२ हा अर्जदार क्र. १ हिने जाबदेणार क्र. १ यांच्या नांदण्यास येण्याकरिता दाखल केलेला आहे. जाबदेणार यांनी अर्जदार क्र. १ हिस नांदविण्यास प्रयत्न केलेले आहेत. परंतु अर्जदार क्र. १ ही जाबदेणार यांच्याकडे नांदण्यास आलेली नाही.

**१४.** जाबदेणार क्र.१ यांचे सन्माननीय विधिज्ञ यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, अर्जदार हिने जाबदेणार क्र. १ याचा कोणतेही संयुक्तीक कारण नसताना त्याग केलेला आहे. अर्जदार क्र. १ ही स्वतःहुन अर्जदार क्र. २ सह तिच्या माहेरी राहत आहे. जाबदेणार यांनी अर्जदार हिचा शारिरीक व मानसिक छळ करून तिचा कौंटुबिक हिंसाचार केलेला नाही. जाबदेणार क्र. १ यास अर्जदाराने कथन केलेप्रमाणे उत्पन्न मिळत नाही. जाबदेणार क्र. १ यांच्यावर जाबदेणार क्र. २ व ३ हे अवलंबुन आहेत. जाबदेणार क्र. १ हा मजुरी करत आहे. तसेच, जाबदेणार क्र. १ यांच्यावर त्यांच्या आईची औषधोपचाराची तसेच, इतर खर्चांची जबाबदारी आहे. त्यामुळे जाबदेणार क्र. १ यांची अर्जदारांना स्वतंत्र पोटगी देण्याची ऐपत नाही. याउलट, अर्जदार क्र. १ ही शिक्षिका असुन ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे. तसेच अर्जदार क्र. १ ही वात्सल्य हॉस्पिटल, शिरूर, ता.शिरुर, जि. पुणे येथे नोकरी करीत आहे. तसेच, अर्जदार क्र. १ हिचे आई—वडीलांचा बांगड्यांचा व्यवसाय असुन त्यापासुन त्यांना ब—यापैकी उत्पन्न मिळते. त्याचप्रमाणे अर्जदार क्र. १ हिच्या आई—वडीलांचे शिरुर येथे स्वमालकीचे घर मिळकत आहे. अर्जदार क्र. १ हिच्या आई—वडीलांचे आर्थिक परिस्थिती चांगली आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ ही स्वतः चा व अर्जदार क्र. २ यांचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे. त्यामुळे अर्जदार हिस आर्थिक लाभ म्हणुन पोटगी मिळण्यास

पात्र नाही. सदरचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

**१५.** अर्जातील कथने व अभिलेखावरील कागदपत्रे यावरून मी खालील मुद्ये माझे विचारार्थ घेतले व त्यातील माझे मत पुढील कारणमिमांसेसह देत आहे.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र. १ ही जाबदेणार यांच्या कौटुंबिक हिंसाचारास बळी पडलेली आहे असे प्रथमदर्शनी दिसुन येते काय? | **होय.** |
| २. | अर्जदार क्र. १ व २ हे आर्थिक लाभ म्हणुन दरमहा अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? पात्र असेल तर किती? | **होय. जाबदेणार क्र. १ यांच्याकडून अर्जदार क्र. १ व २ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रूपये ३,०००/—** |
| ३. | आदेश काय ? | **अर्ज अंशतः मंजुर करण्यात आला.** |

**:: <u>का र ण मि मां सा</u> ::**

**<u>मुददा क्र.१ व २ करीता</u>:**

**१६.** सदर अर्जाचा विचार करतांना कायदेशीर बाबींचा उहापोह करणे योग्य वाटते. कौटुंबिक हिंसाचारपासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ याचे कलम २३ या कायदेशीर तरतुदींचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिपक्ष हा घरगुती जुलूमाचे कृत्य करत असेल किंवा त्याने केले असेल किंवा घरगुती जूलूमाचे कृत्य प्रतिपक्षाने करण्याची शक्यता असेल याबाबत जर प्रथमदर्शनी बाब उघड झाली आहे याबाबत जर दंडाधिका—यांचे समाधान झाले तर व्यथित व्यक्तीने विहीत नमुन्यात केलेल्या प्रतिज्ञापत्राच्या आधारे दंडाधिकारी प्रतिपक्षाविरुध्द या कायद्याखालील कलम १८, १९, २०, २१ किंवा २२ प्रमाणे आदेश करु शकतील.

**१७.** प्रस्तुत प्रकरणाच्या अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, अर्जदार क्र. १ हिने सदर अर्जातील कथनांच्या पुष्टयर्थ निशाणी क्र. ०६ अन्वये प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सदरचा अर्ज व प्रतिज्ञापत्र आणि जाबदेणार क्र.१ याचे निशाणी क्र.१९ वरील म्हणणे यांचे अवलोकन केले असता, अर्जदार क्र. १ व जाबदेणार क्र. १ यांचा विवाह दिनांक १५/०५/२०१६ रोजी शिरूर, ता.शिरूर, जि. पुणे येथे मुस्लिम धर्मशास्त्र व रितीरिवाजाप्रमाणे संपन्न झाला असुन सदर वैवाहीक संबंधातुन अर्जदार क्र.१ व जाबदेणार क्र. १ यांना अर्जदार क्र. २ हे अपत्य झालेले आहे. सदरचा संपुर्ण मजकुर जाबदेणार यांनी मान्य व कबुल केलेला आहे.

**१८.** अभिलेखावरील कागदोपत्रांची अवलोकन केल असता, जाबदेणार क्र.१ याने अर्जदारांचे कोणत्याही रास्त व संयुक्तीक कारणांशिवाय त्याग केलेला आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ सह तिच्या माहेरी राहत आहे असे अर्जदारांचे कथन आहे. जाबदेणार क्र. १ याने अर्जदार हे अर्जदार क्र. १ हिच्या माहेरी राहत असल्याबाबतीची कथने स्पष्टपणे नाकारलेली नाहीत.

**१९.** सदरचा अर्ज, त्यासोबत असलेले प्रतिज्ञापत्रामधील कथने व जाबदेणार क्र.१ यांचे सदर अर्ज व मुळ अर्जावरील म्हणणे यांचे अवलोकन केले असता, अर्जदार क्र. १ ही जाबदेणार क्र.१ यांची पत्नी असुन अर्जदार क्र. २ ही मुलगी आहे. जाबदेणार क्र.१ याने सदरची बाब ही मान्य केली आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ हिचा पती व अर्जदार क्र. २ हिचा पिता या नात्याने त्यांचा सांभाळ करणे व त्यांच्या पालनपोषण व उदरनिर्वाहाची तरतुद करणे ही जाबदेणार क्र.१ याची प्राथमिक व नैतिक जबाबदारी आहे. परंतु जाबदेणार क्र.१ याने अर्जदार क्र. १ व २ हे अर्जदार क्र. १ हिच्या माहेरी राहत असल्यापासुन त्यांचे पालनपोषण व उदरनिर्वाहासाठी आद्यापपावेतो

कोणतीही तरतुद केलेली नाही असे प्रथमदर्शनी अभिलेखावरुन दिसुन येते. सदरची बाब प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचारास पुरेशी आहे. तसेच निशाणी क्र. ९ सोबत दाखल केलेल्या कौटुंबिक घटना अहवाल, अर्जातील कथने आणि अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, अर्जदार क्र. १ ही जाबदेणार यांच्या कौटुंबिक हिंसाचारास बळी पडलेली आहे असे प्रथमदर्शनी दिसून येते. करिता मुद्दा क्र.१ याचा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुददा क्र.२ करीता</u>:**

**२०.** अर्जदार क्र. १ ने निशाणी क्र.१५ वर तिचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. तसेच जाबदेणार क्र.१ याने निशाणी क्र.२४ वर प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सदर प्रतिज्ञापत्रांचे अवलोकन केले असता, अर्जदार क्र. १ हिस कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही असे दिसुन येते. तसेच अर्जदार क्र. २ ही अर्जदार क्र. १ सोबत राहत आहे. अर्जदार क्र. १ ही वात्सल्य हॉस्पिटल, शिरूर, ता.शिरुर, जि. पुणे येथे नोकरी करीत आहे असे जाबदेणार यांचे कथन आहे. परंतु जाब देणार यांनी अर्जदार क्र. १ हिस उत्पन्नाचा स्त्रोत असलेबाबत व ती स्वत:चा व अर्जदार क्र. २ यांचा उदरनिर्वाह करण्यास समर्थ असलेबाबत अद्यापपावेतो कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, अर्जदार क्र. २ ही सद्यस्थितीमध्ये शिक्षण घेत असुन ती पुर्णपणे अर्जदार क्र. १ हिच्यावर अवलंबून असलेबाबत प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यामुळे अर्जदार क्र. १ ही स्वत:चा व अर्जदार क्र २ यांचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे असे प्रथमदर्शनी दिसुन येते.

**२१.** जाबदेणार क्र. १ हे नगर शहरामधील विवो कंपनीच्या शोरूममध्ये नोकरी करीत असुन त्यास सदर नोकरीपासुन दरमहा रक्कम रूपये पस्तीस ते चाळीस हजार रूपये इतका पगार मिळतो असे अर्जदारांचे कथन आहे. परंतु

अर्जदारांनी जाबदेणार क्र. १ यास उपरोक्त नमुद उत्पन्न मिळत असलेबाबत निश्चित व ठोस असा कागदोपत्री पुरावा अद्यापपावेतो अभिलेखावर दाखल केलेला नाही. परंतु जाबदेणार क्र. १ याने दि. १०/०५/२०२४ रोजीचा शॉपबॉय म्हणून काम करीत असलेबाबत दाखला दाखल केलेला आहे. सदर दाखल्याचे अवलोकन केले असता, त्यास दरमहा रक्कम रूपये नउ हजार पाचशे इतका पगार मिळकत असलेबाबत प्रथमदर्शनी दिसुन येते. जाबदेणार क्र. १ यास आईकरीता दरमहा वैद्यकीय उपचाराकरीता खर्च लागतो असे कथन केलेले आहे. परंतु जाबदेणार क्र. १ याने सदर वैद्यकीय खर्चाबाबत निश्चित व ठोस अद्यापपावेतो कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच जाबदेणार क्र.१ यांच्यावर अर्जदार व्यतिरिक्त इतर कोणी अवलंबुन असलेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अद्यापपावेतो अभिलेखावर आलेला नाही. तसेच जाबदेणार क्र. १ हा शारिरीकदृष्ट्या अकार्यक्षम असलेबाबत अद्यापपावेतो कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे जाबदेणार क्र.१ हा मजुरी करू शकतो. तसेच शारिरीक कष्टाचे काम करून त्यास उत्पन्न मिळु शकते.त्यामुळे जाबदेणार क्र. १ यास उत्पन्नाचा स्त्रोत आहे असे प्रथम दर्शनी अभिलेखावरून दिसुन येते. त्यामुळे जाबदेणार क्र.१ यांच्याकडून अर्जदार क्र. १ व २ हे आर्थिक लाभ म्हणुन अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे.

**२२.** उपरोक्त विवेचनावरुन दोन्ही पक्षकारांची आर्थिक परिस्थिती, समाजातील स्थान, अर्जदारांच्या अत्यावश्यक गरजा व उदरनिर्वाह यांचा विचार करता अर्जदार क्र. १ व २ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रूपये ३,०००/— इतकी आर्थिक लाभ म्हणुन अंतरिम पोटगी व सदर अर्जाचा खर्च देणेबाबत जाबदेणार क्र.१ यास आदेशीत करणे न्यायोचित होईल. करिता मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**मुददा क्र.३ बाबत:**

**२३.** वरील विवेचन व मुद्दा क्र.१ व २ यांचे निष्कर्ष विचारात घेतले असता, मुददा क्र.३ याचे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवित येत असुन खालील आदेश पारीत करीत आहे.

:: **आदेश** ::

**१.** अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

**२.** जाबदेणार क्र.१ यास असे आदेशीत करण्यात येते की, त्याने अर्जदार क्र. १ व २ यांना **प्रत्येकी दरमहा रक्कम रूपये ३,०००/— (अक्षरी रूपये तीन हजार मात्र)** अंतरिम आर्थिक लाभ म्हणुन पोटगी अर्ज दाखल तारखेपासुन या प्रकरणाचा निकाल होईपर्यंत दयावी.

**३.** सदर आदेशाची प्रत अर्जदार व जाबदेणार क्र. १ यांना कौटुंबिक हिंसाचारपासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २४ अन्वये विनामुल्य देण्यात यावी.

**४.** सदर अर्जाचा खर्च म्हणुन जाबदेणार क्र. १ याने **रक्कम रू. ५,०००/— (अक्षरी रक्कम रूपये पाच हजार मात्र)** अर्जदारांना एकत्रितरितया हिस देण्यात यावे.

Digitally signed by DOMALE DATTATRAYA BHAUSAHEB
Date: 2024.08.01 12:07:00 +0530

**(द.भा.डोमाळे)**

ठिकाण : घोडनदी—शिरूर
दिनांक : ०१/०८/२०२४

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
घोडनदी,ता. शिरूर, जि.पुणे.

:: **CERTIFICATE** ::

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.N.Sargade |
| Designation of the Court | : | $2^{nd}$ Jt. C.J.J.D.,& J.M.F.C,<br>Ghodnadi, Tal. Shirur, Dist.Pune |
| Date of Order | : | 01/08/2024 |
| Order signed by the P.O. on | : | 01/08/2024 |
| Uploaded on | : | 02/08/2024 |

sd/-xxx
(S.N.Sargade)
Stenographer Grade- III